**तक्रार यूएलपी क्र ९०/२०२०.**
**नि क्र यूडब्ल्यू १ श्रीमती सुनंदा दयानंद लोंढे.**

शपथेवर कथन करतो की;

**माझे नाव श्रीमती सुनंदा दयानंद लोंढे.**

वय. ४८ राहणार.मु.पो.पापरी. ता.मोहोळ; जि.सोलापूर आज मुक्कामी सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि क्र यूडब्ल्यू १ खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**पुढील सरतपास तक्रारदारातर्फे श्री व्ही आर देशपांडे विधिज्ञ यांचेतर्फे**

१४. आता मला कागदपत्र यादी नि क्र यू ९ दाखविण्यात आला. अ क्र १ सामनेवाले यांनी दिलेले पत्र दि. १०.१२.२००९ (छायांकित प्रत) **नि क्र यू १२** वरती आहे. अ क्र २ मूळ फिर्यादी यांनी सामनेवाले यांना दिलेला दि २५.०३. २०१० रोजीचा अज पोचपावतीसह हे **नि क्र यू १३** वरती आहे. अ क्र ३ दि १५. १२.२०१० रोजी मूळ तक्रारदाराने सामनेवाले यांना दिलेला अर्ज **नि क्र यू १४** वरती आहे अ.क्र ४ सामनेवाले यांनी मूळ तक्रारदारांना वैद्यकीय तपासणीकरिता दिलेले पत्र छायांकीत प्रती दि ०९.०४.२०१० **नि क्र यू १५** वरती आहे अ क्र ५ वर मूळ तक्रारदाराने सामनेवाले यास दिलेले पत्र दि २८.०१.२०११ व त्यावरील पोहोच **नि क्र यू १६** वरती आहे अ क्र ६ वरती सामनेवाले यांनी मूळ तक्रारदारांना दिलेले पर्यायी तत्वावर नोकरी मिळणेकरिताचा अर्ज त्यात दिलेले उत्तर

दि १६.०७.२०११ **नि क्र यू १७** वरती आहे. अ क्र ७ वर सामनेवाले यांनी मूळ तक्रारदारांना दिलेला असाधारण बिनपगारी रजा मंजूरी आदेश दि २४.०८.२०११ **नि क्र यू १८** वरती आहे अ क्र ८ सामनेवाले यांनी दिलेले उत्तर छायांकित प्रत दि ०९.०७.२०१८ **नि क्र यू १९** आणि अ क्र सामनेवाले यांनी शिपाई पदी ₹जू होण्याकरिता दिलेला आदेश दि २६.०७.२०११ **नि क्र यू २०** वरती आहे.

**सरतपासणी पूर्ण**

**उलटतपासणी सामनेवाले श्री एस डी होसमनी विधिज्ञ यांचेतर्फे**

१५. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदार सामनेवाले यांचेकडे प्रथमत दि २०.०४.१९९४ रायगड विभागात महाड डेपो येथे चालक म्हणून कामास लागले त्यांचा चालक क्रमांक ३५९९२ होता. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदार रायगड विभागात काम करीत असताना सोलापूर विभागात बदली करिता दि २०.०७.२००० रोजी अर्ज केला. हे म्हणणे खरे आहे की सोलापूर विभागात हजर होताना सामनेवाले यांनी त्यांची नेत्रतपासणीकरिता श्री बिराजदार सिव्हील सर्जन यांचेकडे पाठविले. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदारास तपासणीअंती दोन्ही डोळयांमध्ये दोष आढळून आल्यामुळे दि १०.१२.२००९ रोजी सेवेतून कमी करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की सेवेतून कमी करण्याचे आदेश कोणत्याही न्यायालयात आव्हानित केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदारांना स्थायी वैद्यकीय मंडळकडे अपिल करण्यास परवानगी दिले. हे

म्हणणे खरे आहे की वैद्यकीय मंडळाने तपासणीअंती मूळ तक्रारदारांना दोन्ही डोळयांमध्ये दृष्टी दोष असल्याचे कळविले. हे म्हणणे खरे आहे की म्हणून त्यांना चालक पदासाठी कायमचे अपात्र ठरविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की चालक पदावरती कायमचे अपात्र केल्याने मूळ तक्रारदार म्हणजेच माझे पती यांनी पर्यायी नोकरीकरिता शिपाई नेमणुकीबाबत अर्ज केला. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदारांना दि २६.०७.२०११ रोजीच्या आदेशाने राज्य परिवहन सांगोला आगार येथे शिपाई म्हणून कामावर घेण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की माझे पती रा.प सांगोला आगार येथे रूजू होताना विनातक्रार रूजू झाले आहे. हे मला माहित नाही की चालक असताना मिळणारा पगार तोच पगार शिपाई म्हणून काम करीत असताना मूळ तक्रारदारांना सामनेवाले यांनी दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदार दि १०.१२.२००९ कायम अपात्र ठरलेपासून दि २७.०७.२०११ शिपाई पदी रूजू होईपर्यंत एकूण ५९५ दिवस असाधारण बिनपगारी रजा म्हणून ग्राहय धरण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदाराची सेवा विनाखंड सलग धरण्यात आलेली होती. हे म्हणणे खरे आहे की ५९५ दिवस मूळ तक्रारदार कामावर नसल्यामुळे त्या काळातील मला पगार मागता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की सन २०११ पासून मूळ तक्रारदारांनी सामनेवाले यांना कोणत्याही स्वरूपाचा तक्रारीकरिता अर्ज अगर नोटीस पाठविलेली नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील कलम नं १३ब व क मधील

मागणी मला करण्याचा अधिकार नाही. हे म्हणण खरे नाही की सामनेवाले यांनी कोणताही अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केला नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील संपूर्ण मजकूर चुकीचा व खोटा आहे व मी खोटी साक्ष देत आहे

**उलटतपास पूर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास काही नाही**

सही/–
(मु.रा.कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दिनांक.०१.०८.२०२५
*माकम*